महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार

जिल्हा सामान्य रुग्णालय,परिसर,साक्री रोड,नंदुरबार - 425412

## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NANDURBAR

DISTRICT CIVIL HOSPITAL AREA SAKRI ROAD,NANDURBAR - 425412

Email- deangmchnandurbar@gmail.com Website : http:/gmchnandurbar com

जा.क्र.शावैमनं./आस्था-राजप/रिक्त पदे/जाहिरात/1379 /२०२२, दिनांक:- 21/04/2022

प्रति,
मा. जिल्हा माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती अधिकारी व जनसंपर्क कार्यालय,
नंदुरबार

विषय:- निविदा प्रसिध्द करणेबाबत...

महोदय,

मा. महोदयांनी सोबत जोडलेली निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी आपणांस विनंती करण्यात येत आहे. तरी मा. महोदयांनी सदरील निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | जहिरात प्रसिध्दीस देणाऱ्या अधिकाऱ्याचा हुद्दा | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार-४२५४१२ |
| ०२ | जाहिरात कोणत्या तारखेपुर्वी प्रसिध्द करावयाची आहे. | दिनांक:- २८/०४/२०२२ |
| ०३ | जहिरात प्रसिध्द कशी करावी | स्थानिक स्तरावरील किमान एका मराठी दैनिकातून एकदा |
| ०४ | जाहिरात देयक कोणास पाठवावे | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार |
| ०५ | जहिरात किती वृत्तपत्रातून व किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | स्थानिक स्तरावरील किमान एक मराठी दैनिकातून एकदा |

सेबत:- प्रसिध्द करावयाची जाहिरात नमुना तीन प्रतीत.

अधिष्ठाता,
o/c
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

**टिप:-** सदर जाहिरात एक पेक्षा अधिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येवू नये तसेच जाहिरात ही दोन कॉलम ८ सें.मि. या आकारातच प्रसिध्द करण्यात यावी. तसेच सदर जाहिरातीची देयके तीन प्रतीत शासन निर्णयासह देयका सोबत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

**प्रत:-** आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार

जिल्हा सामान्य रुग्णालय,परिसर,साक्री रोड,नंदुरबार – 425412

## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NANDURBAR

DISTRICT CIVIL HOSPITAL AREA SAKRI ROAD,NANDURBAR - 425412

Email- deangmchnandurbar@gmail.com Website : http:/gmchnandurbar com

जा.क्र.शावैमनं./आस्था-राजप/रिक्त पदे/जाहिरात/ 1380 /२०२२, दिनाक:- 21/04/2022

प्रति,
मा. विभागीय माहिती कार्यालय,
मिडीया सेंटर, बी.डी. भालेकर मैदान,
महाकवी कालिदास कलामंदिर समोर,
नाशिक-४२२००१

विषय:- निविदा प्रसिध्द करणेबाबत...

मा. महोदयांनी सोबत जोडलेली निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी आपणांस विनंती करण्यात येत आहे. तरी मा. महोदयांनी सदरील निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | जहिरात प्रसिध्दीस देणाऱ्या अधिकाऱ्याचा हुद्दा | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार-४२५४१२ |
| ०२ | जाहिरात कोणत्या तारखेपुर्वी प्रसिध्द करावयाची आहे. | दिनांक:- २८.०४.२०२२ |
| ०३ | जहिरात प्रसिध्द कशी करावी | राज्य व विभागीय स्तरावरील किमान एका मराठी दैनिकातून एकदा |
| ०४ | जाहिरात देयक कोणास पाठवावे | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार |
| ०५ | जहिरात किती वृत्तपत्रातून व किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | राज्य व विभागीय स्तरावरील किमान एक मराठी दैनिकातून एकदा |

सेबत:- प्रसिध्द करावयाची जाहिरात नमुना तीन प्रतीत.

अधिष्ठाता,
O/c शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

**टिप:-** सदर जाहिरात एक पेक्षा अधिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येवू नये तसेच जाहिरात ही दोन कॉलम ८ सें.मि. या आकारातच प्रसिध्द करण्यात यावी. तसेच सदर जाहिरातीची देयके तीन प्रतीत शासन निर्णयासह देयका सोबत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

**प्रत माहितीस्तव:-**

१) आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण वसंशोधन, मुंबई

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार

## उपहारगृह व भोजनालयाकरीता निविदा प्रसिध्दीबाबत जाहिरात.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता उपहारगृह सुरु करण्यासाठी तसेच प्रवेशित वैद्यकीय विद्यार्थी /विद्यार्थीनींकरीता वसतीगृहामध्ये उपहारगृह व भोजनालय सुरु करण्यासाठी संस्थास्तरावर निविदा मागविण्यात येत आहे. तरी ज्या इच्छुक निविदाधारकांना उपहारगृह व भोजनालयाकरीता आपण निविदा अर्ज सादर करावयाचा आहे. अशा निविदाधारकांनी संस्थेच्या संकेतस्थळावर http://gmcnandurbar.com पहावे. संस्थेच्या संकेतस्थळावर सविस्तर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय आवार, नर्सिंग इमारत, दुसरा मजला, नंदुरबार येथे सविस्तर जाहिरात व विहीत नमुन्यातील अर्ज रु. २५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्यात यावा.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार

विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या वसतिगृहासाठी भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा मागविणेबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नव्याने कार्यान्वित झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनींना वसतिगृहामध्येच भोजनालय व उपहारगृहाची सोय उपलबध करुन देणे कामी संस्थास्तरावर भोजनालय व उपहारगृहाकरीता खालील प्रमाणे निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

१) निविदा फॉर्म विकी व जमा करावयाची तारीख २१ एप्रिल,२०२२ ते ०५ मे,२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत)

२) निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण :- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, नर्सिंग कॉलेज इमारत, दुसरा मजला, नंदुरबार

३) निविदा उघडण्याची तारीख १० मे,२०२२ रोजी. सकाळी ११.३० वाजता. संस्थेचे संकेतस्था. http://gmc.nandurbar.com

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

# भोजनालय व उपहारगृह निविदा

नंदुरबार येथे नव्यानेच जिल्हा सामान्य रुग्णालय, नंदुरबार यांचे आवारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित झालेले असून संलग्नित रुग्णालय म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय महाविद्यालयास हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनींसाठी रुग्णालय आवारात व मुलींचे वसतीगृह येथे भोजनालय ११ महिन्यांच्या करारारे भाडे तत्वावर चालविण्यासाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

सदरील निविदा फॉर्म शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथील प्रशासकीय कार्यालयात रुपये.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) रोखपाल शाखेत भरुन निविदा फॉर्म मिळेल निविदा फॉर्म जमा करतांना अनामत रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) रोखापाल शाखेत भरावी लागेल व सदर अनामत रकमेच्या पावतीची छायांकित प्रत निविदा प्रपत्रासोबत जोडवी लागेल. अनामत रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) भरल्याशिवाय निविदा फॉर्मचा विचार केला जाणार नाही.

भोजनालय चालविण्यासाठी कार्यालयाने घालून दिलेल्या अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहतील. सदरील अटी व शर्ती प्रपत्रासोबत उपलब्ध उपलब्ध होतील. सदरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदा धारकाचे हमीपत्र स्वत:च्या स्वाक्षरी व शिक्क्यासह असावे.

१) मोहोरबंध तांत्रिक लिफाफा क्र.१ व २ मध्ये खालील दिलेले कागदपत्र असणे आवश्यक असून जोडणे अनिवार्य आहे.

अ) शॉप ॲक्ट लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे.)
ब) फुड अँण्ड ड्रग्ज लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)
क) इन्कम टॅक्स विवरणपत्र (मागील तीन वर्षाचे)
ड) भोजनालय व उपहारगृह चालविण्याबाबतचे अनुभव (शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालय) प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य
इ) पॅन कॉर्ड
ई) इ.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार )
उ) पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)
ऊ) जी.एस.टी. प्रमाणपत्र

२) मोहोरबंध लिफाफा क्र. १ व २ मध्ये पुरविण्यात येणाऱ्या सकाळचा नास्ता व दुपारचे भोजन व रात्रीचे भोजन यांचे दर भरुन देणे आवश्यक राहील.

सदरील मोहोरबंध निविदा तांत्रिक लिफाफा क्र.१ व २ हा दिनांक ५ मे,२०२२ रोजी ठीक सायं.५.०० वाजेपर्यंत आवक शाखेत जमा करण्यात यावे. तसेच सदर निविदा उघडण्याची तारीख आपणांस कळविण्यात येईल. सदर निविदा ही मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार यांचे दालनात उघडण्यात येईल. त्याचप्रमाणे तांत्रिक लिफाफयाची पुर्तता पुर्ण करणाऱ्या पुरेशा निविदा धारकांची लिफाफा क्र. उघडण्याची कार्यवाही भोजनालय समिती ठरवेल त्यावेळी उघडण्यात येईल.

निविदा स्विकारण्याचे अगर नाकारण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

# : निविदा प्रपत्र :

श्री/श्रीमती........................................................................आपणांस विनंतीपुर्वक सादर करु इच्छितो/इच्छिते की, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे प्रवेशित झालेलया विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी निविदा प्रपत्र सादर करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपुर्ण नांव | : | |
| २. | अ) संपुर्ण स्थानिक पत्ता<br><br>संपर्कासाठी पत्ता: | : | १)<br>२) |
| | ब) कायम वास्तव्य असलेला पत्ता | : | |
| ३. | सद्या करीत असलेला व्यवसाय सरकारी तत्वावर असल्यास नोंदणी क्रमांकासह सविस्तर माहिती द्यावी. | : | |
| ४. | आपणांस औहखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तिच्या स्वाक्षऱ्या. शिक्क्याची सही स्विकारली जाणार नाही. | : | १) संपुर्ण नांवः-<br>पत्ताः-<br>सही व दुरध्वनी क्रामंक<br><br>२) संपुर्ण नांवः-<br>पत्ताः-<br>सही व दुरध्वनी क्रामंक |
| ५. | या निविदा फॉर्म सोबत मी चौकटीत (√) अशी खुण केलेली कागदपत्रे जोडलेली आहे.<br>अ) शॉप ॲक्ट लायसन्य (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)<br>ब) फुड ॲण्ड ड्रग्ज लायसन्स (अद्यावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले असावे)<br>क) इन्कम टॅक्स विवरणपत्र (मागील तीन वर्षाचे)<br>ड) भोजनालय व उपहारगृह चालविण्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र (शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालय)असल्यास प्राधान्य<br>इ) पॅन कॉर्ड<br>ई) इ.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकते नुसार )<br>उ) पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)<br>ऊ) जी.एस.टी. प्रमाणपत्र | | |

मी असे लिहून देतो / देते की, आपल्या परिशिष्ट मधील सर्व अटी व शर्ती मी वाचलेल्या आहेत व त्या मला मान्य असून बंधनकारक आहेत.

निविदा धारकाची स्वाक्षरी—————————

निविदा धारकाचे संपुर्ण नांव—————————

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार

## अटी व शर्ती बाबतचे परिशिष्ट

नंदुरबार येथे नव्यानेच जिल्हा सामान्य रुग्णालय, नंदुरबार यांचे आवारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित झालेले असून संलग्नित रुग्णालय म्हणून जिल्हा सामान्य रुग्णालय महाविद्यालयास हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनीसाठी रुग्णालय आवारात भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| ०१ | सदर भोजनालय व उपहारगृह हे फक्त या महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनीसाठी चालवावयाचे आहे. |
| ०२ | भोजनालय व उपहारगृहासाठी वापरण्यात येणार खाद्यपदार्थ, सर्व प्रकारच्या भाजी, डाळी, कडधान्ये, तेल, तुप व इतर खाद्यपदार्थ उत्तम प्रतीची असावीत. भोजनालय व उपहारगृहात चांगल्या प्रतीचे भोजन तयार करावे. तो अधिकाऱ्यांकडून अचानकपणे तपासला जाईल. भोजनाच्या पदार्थांचा दर्जा व गुणवत्तेच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जोईल. |
| ०३ | भोजनालय व उपहारगृहासाठी या कार्यालयाकडून फक्त जमा उपलब्ध करुन दिली जाईल. काही किरकोळ बदल करावयाचे असल्यास कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील. |
| ०४ | भोजनालय हे दुपारचे जेवणासाठी दु.१२.०० ते ०३.०० या वेळेत सुरु ठेवावे आणि रात्रीचे जेवणसाठी रात्री ०७.०० ते १०.३० पर्यंत सुरु ठेवावे. तसेच उपहारगृह हे सकाळी ०७.०० ते १०.०० व दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत सुरु ठेवावे. |
| ०५ | भोजनालय व उपहारगृहाची सुरक्षा व्यवस्था ही भोजनालय चालकाने स्वतः ठेवावी. |
| ०६ | भोजनालय व उपहारगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची नियमित किमान ३ महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी करुन त्याचा अहवाल वेळोवेळी प्रशासनास सादर करणे बंधनकारक आहे. |
| ०७ | भोजनालय व उपहारगृहात बसण्यासाठीची व्यवस्था उदा. टेबल, खुर्ची व इतर फर्निचर भोजनालय चालकाने स्वतः करावी. |
| ०८ | भोजनालय व उपहारगृहासाठी लागणारी विद्युत पुरवठा कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिली जाईल. परंतु भोजनालय चालकाला स्वःखर्चाने सबमीटरचा खर्च करावा लागेल व वापरलेल्या विजेचा खर्च हा सबमीटरप्रमाणे या कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेपर्यंत/तत्पुर्वी भरणा करावा लागेल. बिज बील उशिराने भरल्यास त्यास नियमाप्रमाणे दंड आकारला जाईल. |
| ०९ | भोजनालय व उपहारगृहासाठी पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे देयक आपणास कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेपर्यंत तत्पुर्वी भरणा करावा लागेल. |
| १०. | भोजनालय व उपहारगृहासाठी तयार केलेले अन्न / खाद्यपदार्थ हे उघडे ठेवण्यात येऊ नयेत व पदार्थांचा दर्जा व गुणवत्ता राखणे तसेच स्वच्छता राखण्याची जबाबदारी भोजनालय चालकावर बंधनकारक आहे. |
| ११. | भोजनालय व उपहारगृहासाठी लागणारी सर्व प्रकारची भांडी, गॅस तसेच इतर साहित्य आणण्याची जबाबदारी भोजनालय चालकावरच राहील. |
| १२. | भोजनालय व उपहारगृह चालवितांना आपणांस भोजनालयामध्ये अग्निशामक उपकरणे स्वःखर्चाने ठेवावी व हाताळावी लागतील. |
| १३ | आपण चालविणार असलेले भोजनालय हे अन्न व औषध प्रशासन विभागाने घालून दिलेल्या प्रमाणकानुसार असावे. |
| १४. | भोजनालय व उपहारगृहात काम करणारे कामगार ठेवणे व त्यांचा पगार देणे याची सर्वस्वी जबाबदारी भोजनालय चालकाची राहील. कामगाराचे वय १८ वर्ष व त्यापेक्षा जास्त असावे. कमी वयाचे अथवा बाल कामगार असू नयेत. |
| १५. | भोजनालय व उपहारगृहातून विद्यार्थीनीसाठी पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थाचे उधारीचे पैसे वसूल करण्याची जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. |
| १६ | आपणांस सदरचे भोजनालयाच्या इमारतीमध्ये पोट भाडेकरु ठेवता येणार नाही. |
| १७. | आपणांस सदरचे भोजनालयाचे हस्तांतरण इतरांना करता येणार नाही. |
| १८. | आपल्या भोजनालयात कामकरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे छायाचित्र, निवास पत्ता संपर्कक्रमांक या |

| | |
|---|---|
| | कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. |
| १९. | भोजनालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत काही तक्रारी असल्यास परस्पर कार्यवाही न करता अधिष्ठाता वैद्यकीय अधिक्षक, प्रशासकीय अधिकारी यांचेकडे तोंडी / लेखी स्वरुपात तक्रार करावी. |
| २० | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने ठरविल्याप्रमाणे भोजनालय व उपहारगृहासाठी जागेचे भाडे विद्युत पुरवठ्याची देयके पाणीपटटी देयके भोजनालय चालकाने या कार्यालयाच्या रोखपाल शाखेकडे दरमहा १० तारखेच्या आत भरावी. |
| २१ | भोजनालय व उपहारगृह चालकास रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतकी अनामत रक्कम म्हणून ठेवावी लागेल व त्याची पावती रोखपाल यांचेकडे प्राप्त करुन घ्यावी. ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत आपणाकडून इमारतीचे नुकसान झाल्यास तोडफोड झाल्यास किंवा आपणाकडे काही येणे बाकी असल्यास सदरील अनामत रकमेतून ते वसूल करण्यात येईल. कराराची मुदत संपण्यापुर्वी भोजनालय व उपहारगृह बंद केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| २२ | भोजनालय चालकास रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर ११ महिन्याचा करारनामा करुन द्यावा लागेल. ११ महिन्याच्या कालावधीनंतर हा करारनामा आपोआप संपुष्टात येईल. |
| २३. | खाद्यपदार्थाचा दर्जा समाधानकारक असल्यास स्वच्छता व इतर बाबींची पुर्तता केल्यास ११ महिन्याचा कालावधी पुढे चालू ठेवण्याचा अधिकार अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार यांनी राखून ठेवलेला आहे. |
| २४. | भोजनालय व उपहारगृह कोणत्याहीक्षणी बंद करणे किंवा कोणतेही कारण न देता करार रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| २५. | निविदा फॉर्म घेतांना रु.५०००/- मात्र निविदा अनामत रक्कम भरावी लागेल. |
| २६. | भोजनालयातील कर्मचाऱ्यांची वेळोवेळी शारीरिक तपासणी करुन घ्यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रमाणपत्र शॉप ॲक्ट लायसन्स भोजनालय व उपहारगृह चालविण्याचे अनुभव प्रमाणपत्र. संस्था नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| २७. | भोजनालय व उपहारगृहात आहार पुरवितांनाउत्तम दर्जा राखणे अन्नातून विषबाधा झाल्यास किंवा जिवितहानी अपाय झाल्यास त्या संबंधित भोजनालय चालक जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. |
| २८. | भोजनालय व उपहारगृहात कोणतीही दुर्घटना झाल्यास व भोजनालयातील कर्मचाऱ्यास दुखापत/मृत्यु झाल्यास सदरची नुकसान भरपाई/ मोबदला देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही भोजनालय चालकाची राहील. त्याच प्रमाणे सदर प्रकरणी न्यायप्रविष्ट बाबी अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी भोजनालय चालकाची राहील. त्या अनुषंगाने नियमानुसार भोजनालयात कार्यरत सर्व कर्मचारी यांची योग्य ते इन्शुरसन्स (विमा) जबाबदारी ही भोजनालय चालकाची रहील याबाबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार कोणतीही जबाबदारी घेणार नाही याची नोंद घ्यावी. |
| २९. | निविदेमध्ये जो आहार जाहिरकरण्यात आलेला आहे. तोच आहार देणे बाबत निविदाधारकाने दक्षता घ्यावी. |

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

वरिल प्रमाणे निविदा प्रपत्रातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून तया माझ्यावर बंधनकारक राहतील. त्याबाबत मी खालील स्वाक्षरी करुन सादर करीत आहे.

निविदा धारकाची स्वाक्षरी, नांव व पत्ता:- ____________________

____________________

दिनांक:-

# भोजनालय व उपहारगृहाच्या जागेबद्दल दरमहा भरावयाचे भाडे

मी/श्रीमती———————————————— आपणांस विनंतीपुर्वक सादर करु इच्छिते /इच्छितो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, नंदुरबार येथील आवारातील———————— असलेल्या इमारतीमध्ये महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थीनीसाठी भोजनालय व उपहारगृह चालविण्यासाठी निविदा प्रपत्र सादर करीत आहे.

१) संपुर्ण नांव :- ————————————

२) संपुर्ण स्थानिक पत्ता :- ————————————

३) संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक :- १) ———————— २) ————————

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार जिल्हा समान्य रुग्णालय आवारातील ————**

———————— असलेल्या इमारत येथे उपलब्ध करुन दिलेल्या जागेच्या मोबदल्यात मी शासनास खालील प्रमाणे भाडे दरमहा भरण्यास तयार आहे.

जागेबद्दलचे भाडे दरमा रुपये:-

(अक्षरी रुपये————————————)

मी असे लिहून देतो/देते की, वरील प्रमाणे मी लिहून दिलेले दरमहाचे जागेचे भाडे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेले भाडे यापैकी जे अधिक असेल ते मी दरमहा कार्यालयाच्या रोखपाल शाखेत भरण्यास बांधिल राहील. दरमहाचे भाडे थकल्यास किंवा न भरल्यास भोजनालय व उपहारगृह अधिष्ठाता किंवा त्यांचे प्रतिनिधी तात्काळ बंद करतील याची मला जाणीव आहे.

निविदा धारकाची स्वाक्षरी ————————————

निविदा धारकाचे संपुर्ण नांव————————————

(सुचना हे प्रपत्र पुर्ण भरुन लिफाफा क्र.२ मध्ये सिलबंद करुन टाकावे)

## भोजनालयात पुरविण्यात येणारे दुपारचे व रात्रीचे जेवणाचे दर खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | जेवणातील पदार्थ | दर |
|---|---|---|---|
| १. | दुपारचे जेवण | वरण / दाळ, भात, चपाती/पोळी सुकी भाजी, पातळ भाजी, दही, पापड, लोणचं, कांदा/मुळा, टोमॅटो/ गाजर, लिंबु, मीठ | |
| २. | रात्रीचे जेवण | वरण / दाळ, भात, चपाती/पोळी सुकी भाजी, पातळ भाजी, दही, पापड, लोणचं, कांदा/मुळा, टोमॅटो/ गाजर, लिंबु, मीठ | |
| | **टिप:-** १) दर रविवारी शाकाहारी जेवण करणाऱ्यांना रोजच्या जेवणा व्यतिरिक्त स्वीट देणे.<br>२) दर रविवापरी मांसाहारी जेवण करणाऱ्यांना मटन / चिकन/अंडाकरी थाळी देणे. | | |

(सुचना हे प्रपत्र पुर्ण भरुन लिफाफा क्र.२ मध्ये सिलबंद करुन टाकावे)

# विद्यार्थ्यांकरीता उपहार गृहात पुरविण्यात येणारे खाद्यपदार्थांचे दर खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदार्थांचे नांव | दर | |
|---|---|---|---|
| | | रुपये | पैसे |
| १ | मिसळ प्लेट पावसह | | |
| २ | बटाटे वडा २ नग सांबरसह | | |
| ३ | मेंदुवडा २ नग सांबरसह | | |
| ४ | इडली २ नग सांबरसह | | |
| ५ | समोसा १ नग | | |
| ६ | कचोरी १ नग | | |
| ७ | खमण टोकळा प्लेट (२५० ग्रॅम) | | |
| ८ | सिंगल अंडा आमलेट प्लेट (पावसह) | | |
| ९ | डबल अंडा आमलेट प्लेट (पावसह) | | |
| १० | सिंगल अंडा भुर्जी (पावसह) | | |
| ११ | पोहे प्लेट (२५० ग्रॅम) | | |
| १२ | आलु पराठा १ नग (२५० ग्रॅम) | | |
| १३ | चहा साधा | | |
| १४ | चहा (स्पेशल) | | |
| १५ | कॉफी (साधी) | | |
| १६ | नेसकॉफी | | |
| १७ | गरम दुध १ ग्लास (साखरेसह) | | |
| १८ | बॉर्नव्हिटा दुध | | |
| १९ | साबुदाणा १ प्लेट | | |
| २० | शिरा / उपमा १ प्लेट | | |
| २१ | चना उसळ १ प्लेट | | |
| २२ | उकळलेले अंडी ०२ नग | | |
| २३ | वेज पुलाव हाफ | | |
| २४ | वेज पुलाव फुल | | |

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार

# जाहिरात

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नव्यानेच कार्यान्वित झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनींना वसतिगृहामध्येच भोजनालय व उपहारगृहाची सोय उपलब्ध करुन देणेकामी संस्थास्तरावर भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तरी ज्या इच्छुक निविदाधारकांना भोजनालय व उपहारगृहाकरिता निविदा अर्ज करावयाचा असेल त्यांनी संस्थेच्या संकेतस्थळावर पहावे. संस्थेच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निविदा फॉर्म शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, नर्सिंग इमारत, दुसरा मजला, नंदुरबार येथे मिळतील.

१) निविदा फॉर्म विक्री व जमा करावयाची तारीख २१ एप्रिल,२०२२ ते ५ मे,२०२२

२) निविदा उघडण्याची तारीख १० मे,२०२२ सकाळी ११.३० वजता

**संस्थेचे संकेतस्थळ** - http://gmchnandurbar.com

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार